# "I Nilesh Dnayndev Lanke....!"







# पारनेर दर्शन








वर्ष १ अंक २५४, बुधवार २६ जुन २०२४ | ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे | RNI No.MAHMAR/2015/61493 | किंमत : ३ रुपये



# डॉ. विखे यांच्या नाकावर टिच्चून खा. लंके यांची इंग्रजीतून शपथ!


## ■ खा. लंके यांच्या शपथेनंतर नगर दक्षिण मतदारसंघात जल्लोष ■ फटाक्यांची आतिषबाजी आणि घोषणाबाजी

नवी दिल्ली : विशेष प्रतिनिधी

**I Nilesh Dnayndev Lanke अशी इंग्रजीमध्ये शपथ घेत नगर दक्षिण मतदारसंघाचे खासदार नीलेश लंके यांनी सर्वांनाच आश्चर्याचा धक्का दिला. मी जे इंग्रजी, हिंदी बोललो ते महिनाभर पाठ करा, तुम्ही बोललात तर मी लोकसभा निवडणूकीचा अर्जही भरणार नाही असे आव्हान देणाऱ्या माजी खासदार डॉ. सुजय विखे यांच्या नाकावर टिच्चून खा. नीलेश लंके यांनी संसदेत मंगळवारी सकाळी शपथ घेतली. लंके यांच्या शपथविधीनंतर पारनेर तालुक्यासह संपूर्ण नगर दक्षिण मतदारसंघात फटाक्यांची आतिषबाजी करीत खा. लंके यांच्या जयजयकाराची घोषणाबाजी करण्यात आली.**

खा. नीलेश लंके हे मंगळवारी सकाळी २९८ क्रमांकावर शपथ घेणार असल्याचे जाहिर करण्यात आल्याने लंके समर्थकांसह मतदारसंघातील नागरीकांचे डोळे दुरचित्रवाहीनीवर दाखविण्यात येत असलेल्या थेट प्रक्षेपणाकडे होते. २९८ क्रमांकावर लंके यांचे नाव पुकारण्यात आल्यानंतर लंके यांनी आपल्या आसनावरून उठून अध्यक्षांशेजारील डायसवर ते गेले आणि त्यांनी थेट इंग्रजीमधून शपथ घेण्यास सुरूवात केली. लंके यांनी शपथ घेतल्यानंतर ते अध्यक्षांजवळ जाऊन नतमस्तक होत त्यांनी महाराष्ट्राच्या परंपरेचेही दर्शन घडविले.










■ शपथ घेण्यासाठी संसदेत जाताना खा.लंके हे संसदेच्या पायऱ्यांवर नतमस्तक झाले. ■ नगर लोकसभा मतदारसंघाचे खासदार नीलेश लंके यांनी मंगळवारी संसदेमध्ये इंग्रजीमध्ये शपथ घेतली.
■ खा. लंके यांनी शपथ घेतल्यानंतर पारनेर येथील संपर्क कार्यालयाबाहेर फटाक्यांची आतिषबाजी करण्यात आली. ■ सुपे येथील अतिक्रमण धारकांनी लंके यांनी शपथ घेतल्यानंतर फटाक्यांची आतिषबाजी केली.

### इंडिया आघाडीच्या खासदारांकडून बाके वाजवून कौतुक

लोकसभा निवडणूकीदरम्यान भाजपाचे उमेदवार मा. खा. डॉ. सुजय विखे यांनी नीलेश लंके यांना इंग्रजी बोलण्यावरून हिणवल्यानंतर तो मुद्दा चांगलाच गाजला. विविध वृत्तवाहिन्यांनी त्याची दखल घेतली. त्यानंतर मात्र मा. खा. डॉ. सुजय विखे यांच्यावर चांगलीच टीकेची झोड उठविली होती. इंग्रजीचा मुद्दा चांगलाच गाजलेला असल्याने इंडिया आघाडीच्या खासदारांना त्याची कल्पना होती. लंके यांनी इंग्रजीमधून शपथ घेतल्यानंतर इंडिया आघाडीच्या सभागृहातील खासदारांनी बाके वाजवून लंके यांचे कौतुक केले.

### रामकृष्ण हरी

शपथ पुर्ण झाल्यानंतर लंके यांनी जय हिंद, जय महाराष्ट्र, रामकृष्ण हरी म्हणत डायस सोडले. लंके यांनी वारकरी सांप्रदायातील रामकृष्ण हरी हा परवलीचा शब्द आपल्या शपथेनंतर उच्चारल्याने वारकरी सांप्रदायाकडूनही त्यांचे कौतुक करण्यात आले. विधानसभेत शपथ घेतानाही लंके यांनी रामकृष्ण हरी हा शब्द उच्चारला होता. त्यानंतर वारकरी सांप्रदायाच्या वतीने लंके यांचा विशेष सत्कार करण्यात आला होता.

### नीलेशचा आम्हाला अभिमान !

संसदेत मराठीतच काय कोणत्याही भाषेत बोलता येते. संबंधित व्यक्ती ज्या भाषेत बोलते त्याचे तिथे भाषांतर होते. एखादी व्यक्ती जनमानसात काम करणारी, ती संसदेमध्ये जात असेल तर त्या व्यक्तीच्या भाषेवरून प्रश्न उपस्थित करणे हे काही शहाणपणाचे लक्षण नाही. मात्र शपथ घेताना नीलेशने त्याला उत्तर दिले याचा आम्हाला अभिमान आहे.

**खा. शरद पवार**
अध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार

### लोकांच्या साथीमुळे नीलेशचा विजय सुकर

सुरूवातीपासून आम्ही नीलेशला व्यवसायाकडे वळविण्याचा प्रयत्न केला. शिक्षणामध्ये पुढे जाण्यासाठी प्रोत्साहन दिले. मात्र त्याची ओढ समाजकारणाकडे होती. इयत्ता आठवीमध्ये असताना मधल्या सुटीमध्ये हिंदू-हृदय सम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे हे पारनेर येथे सभेसाठी जात असताना हंगे येथे थांबले होते. नीलेश तिथे गेल्यानंतर स्व. ठाकरे यांनी त्याच्या डोक्यावर हात ठेवला. त्यानंतर तो इतका चंचल झाला की पुढच्या काळामध्ये तो समाजाशी एकनिष्ठ राहिला. पुढे संघटनशक्ती वाढत गेली. त्यावेळेपासून अगदी ग्रामपंचायत ते खासदारपदापर्यंत सर्वसामान्यांचे प्रश्न त्याने स्वतः हाताळलेले आहेत. महाराष्ट्रालाही वाटत नव्हते की नीलेश ही लढाई जिंकेल. धनशक्ती विरूध्द जनशक्तीच्या या लढाईमध्ये लोकांनी वर्गणी करून नीलेश यांना निवडणूकीसाठी मदत दिली. दुसरीकडे कारखानदाराविरोधात लढा देणे सोपे नव्हते. मात्र लोकांच्या साथीमुळे नीलेशचा विजय साकार झाला.

**ज्ञानदेव लंके**
खा. लंके यांचे वडील

### लंके यांच्या संपर्क कार्यालयांमध्ये आनंदोत्सव

खा. नीलेश लंके यांच्या पारनेर व नगर येथील संपर्क कार्यालयांमध्ये शपथविधीनंतर फटाक्यांची आतिषबाजी करून, पेढे वाटून आनंदोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी लंके यांच्या समर्थणार्थ जोरदार घोषणाबाजीही करण्यात आली. पारनेर येथे दीपक लंके, अर्जुन भालेकर, डॉ. बाळासाहेब कावरे, योगेश मते, रविंद्र राजदेव, अनिल चौधरी, राजू तराळ, भाऊ रासकर, श्रीकांत चौरे यांच्यासह अनेक लंके समर्थक उपस्थित होते. खा. लंके यांच्या शपथविधी वेळी नगर येथील संपर्क कार्यालयाबाहेर स्क्रिन लावण्यात आली होती. लंके यांनी इंग्रजीतून शपथ घेण्यास सुरूवात केल्यानंतर तिथे एकच जल्लोष झाला. त्यानंतर फटाक्यांची आतिषबाजी करीत पेढे वाटून आनंदोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी मा. महापौर भगवान फुलसौंदर, शिवाजी कराळे, प्रवीण वारूळे, किरण लंके, सचिन कराळे, अमोल कांबळे, गणेश रोडे, सागर जपकर, संचित निकम, रवी धनवटे, सौरभ सुंबे, अक्षय शिंदे, गणेश तोडमल यांच्यासह लंके प्रतिष्ठाणचे कार्यकर्ते उपस्थित होते.

### अतिक्रमणधारकांकडून आतिषबाजी

लोकसभा निवडणूकीनंतर महसूल विभागाकडून सुपा परीसरातील अतिक्रमणे जमीनदोस्त करण्यात आली. महसूलमंत्री राधाकृष्ण विखे हे असतानाही अतिक्रमणधारकांना दिलासा मिळू शकला नाही असा रोष त्यांच्याकडून व्यक्त करण्यात येत आहे. अतिक्रमण विरोधी पथकाकडून व्यवसायींकांच्या अतिक्रमणांबरोबच मंदिरेही हटविण्यात आल्याचा त्यांचा आक्षेप आहे. माता भगिनी रडत असतानाही त्याची कदर न करता अतिक्रमणे हटविण्यात येऊन रोजी रोटीवर प्रश्नचिन्ह निर्माण केले गेले. अतिक्रमणाचा सर्व ठपका विखे यांच्यावर ठेवत आम्ही खा. नीलेश लंके यांनी शपथ घेतल्यानंतर फटाक्यांची आतिषबाजी केल्याचे व्यवसायीक भाऊ निवडूंगे यांनी सांगितले. यावेळी दादा दळवी, सचिन पठारे, हनुमंत भोसले, अक्षय थोरात, अमोल पवार, प्रशांत शिंदे यांच्यासह नीलेश लंके प्रतिष्ठानचे कार्यकर्ते उपस्थित होते.

### मतदार संघातील प्रत्येक व्यक्तीला आनंद

मतदारसंघातील सर्वसामान्य जनता, शेतकरी, कष्टकरी जनतेने नीलेश लंके यांना भरभरून मते देउन संसदेत पाठविले. त्यासाठी महाविकास आघाडीचे नेते, प्रत्येक गावागावातील कार्यकर्ते यांनी आहोरात्र परीश्रम घेतले. त्याचे हे फळ आहे. आमच्या कुटूंबाकडून सर्व जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्टा केली जाईल. आज नीलेश यांनी संसदेत शपथ घेतली त्याचा मतदारसंघातील प्रत्येक व्यक्तीला आनंद आहे. गोरगरीब जनतेने आज दिवाळी साजरी केली.

**दीपक लंके**
खा. लंके यांचे बंधू

### नीलेशने स्वप्न पुर्ण केले

नीलेश आज खासदारपदाची शपथ घेत आहे त्याचा आम्हाला, आमच्या नातेवाईकांना व सर्व कार्यकर्त्यांना आनंद आहे. मतदारसंघातील सर्व तालुक्यातील जनतेसाठी आजचा दिवस आनंदाचा आहे. नीलेश काहीतरी करून दाखवेल असे आमचे सर्वांचे स्वप्न होते. खासदारपदाच्या निवडणूकीत यश संपादन करून त्याने आमचे स्वप्न पुर्ण केले आहे.

**शकुंतला लंके**
खा. नीलेश लंके यांच्या मातोश्री

### संसदेच्या पायरीवर लंके नतमस्तक

लोकशाहीचे पवित्र मंदिर असलेल्या संसदेमध्ये प्रवेश करताना मंगळवारी खा. नीलेश लंके हे संसद भवनाच्या पायरीला स्पर्श करून नतमस्तक झाले. या सभागृहाच्या माध्यमातून मतदारसंघातील जनतेचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी मला उर्जा मिळेल असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

### लंके यांनी आत्मविश्वास अधोरेखीत केला

संसदेतील माझे पहिले भाषण इंग्रजीमध्ये होईल असे खा. नीलेश लंके यांनी निकालानंतर सांगितले होते. त्यांनी संसदेत गेल्यानंतर आपली शपथही इंग्रजीमध्ये घेत आपला आत्मविश्वास अधोरेखीत केला. लंके यांनी शपथ घेतल्यानंतर संपूर्ण मतदारसंघात आनंदोत्सव साजरा झाला. जनतेला सुशिक्षित व जनतेची सेवा करणारा खासदार हवा होता तो लंके यांच्या रूपाने मिळाला आहे.

**अर्जुन भालेकर**
जिल्हा उपाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी

### सोन्याचा दिवस

एका सर्वसामान्य घरातील तरूण संसदेमध्ये आज शपथ घतोय हा क्षण निश्चित सुखावणारा आहे.आमच्यासाठी हा सोन्याचा दिवस आहे. भारतीय लोकशाहीची ही खरी ताकद आहे. लंके यांनी इंग्रजीमध्ये शपथ घेऊन विरोधकांना सनसनीत चपराक दिली असून ज्याप्रमाणे त्यांनी विधानसभेमध्ये कामाच्या माध्यमातून त्यांनी ठसा उमटविला तसेच कर्तुत्व ते संसदेतही सिध्द करतील.

**डॉ. बाळासाहेब कावरे**
जिल्हाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस डॉक्टर सेल

### जे बोलतो तेच करतो !

जे बोलतो तेच करतो व जे करतो तेच बोलतो असे आपल्या शब्दावर ठाम राहून वाटचाल करणारे खा. नीलेश लंके यांचे व्यक्तीमत्व आहे. त्यांनी शब्द दिल्याप्रमाणे इंग्रजी भाषेमध्ये शपथ घेत कामकाजाला सुरूवात केली. जे इंग्रजी बोलता येते का असे म्हणत होते त्यांना ही सनसणीत चपराक आहे.

**योगेश मते**
सभापती, पाणीपुवठा समिती
नगरपंचायत, पारनेर

### तालुक्याचा भूमीपुत्र खासदार होतोय

देशाच्या इतिहासात आज पहिल्यांदाच पारनेर तालुक्याचा भूमीपुत्र खासदार होतोय. या क्षणाचे साक्षीदार होण्यासाठी आम्ही सर्वजण नवी दिल्ली येथे आलेलो आहोत.

**सुवर्णा धाडगे**
तालुकाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस महिला आघाडी

### पप्पांकडून सर्वसामान्यांच्या हिताची जपवणूक होईल

देशाचे सर्वोच्च सभागृह असलेल्या संसदेमध्ये माझे पप्पा खासदार म्हणून शपथ घेत आहेत याचा मोठा आनंद आहे. लोकसभेमध्ये त्यांच्याकडून सर्वसामान्यांच्या हिताची जपवणूक होईल. शेतकरी, शेतमजूर यांच्या प्रश्नांवर ते आवाज उठवतील याची मला खात्री आहे.

**शिवम लंके**
खा. लंके यांचा मुलगा

### काका संधीचं सोनं करणार !

आजचा हा क्षण आनंदाचा आहे. अहिल्यानगरच्या सर्व जनतेमुळे काकांना ही संधी मिळाली असून या संधीचे काका सोनं केल्याशिवाय राहणार नाहीत. खासदार झाले तरी ते जमीनीवरच आहेत.

**आकांक्षा दीपक लंके**
खा. लंके यांची पुतणी











# तंत्रमंत्र

विज्ञानयुगातील बितंबातम्या

## तुमचा WiFi पासवर्ड विसरलात? काळजी नको... आम्ही सांगतो ते करा...



**जर तुम्ही वायफाय वापरत असाल आणि पासवर्ड शोधण्यात अडचण येत असेल किंवा तुम्ही तुमचा वायफाय पासवर्ड विसरला असाल तर काळजी करण्याची गरज नाही. आम्ही तुम्हाला काही सोप्या युक्त्या सांगणार आहोत. त्याच्या मदतीने तुम्हाला वायफाय पासवर्ड लक्षात ठेवणे खूप सोपे होईल. याशिवाय तुम्हाला पासवर्ड कुणासोबत शेअर करायचा असेल तर तुम्हाला या सोप्या पद्धती फॉलो कराव्या लागतील...**

### Android फोनमध्ये कसे शोधायचे ?

अँड्रॉईड फोनमधील वायफायचा पासवर्ड जाणून घेण्यासाठी सर्वप्रथम तुम्हाला सेटिंगमध्ये जावे लागेल. यामध्ये तुम्हाला WiFi चा पर्याय दिसेल. इथे गेल्यावर तुम्हाला भरपूर वायफाय दिसेल. आता तुम्हाला जाणून घ्यायच्या असलेल्या कोणत्याही वायफाय नेटवर्कच्या पासवर्डची माहिती तुम्ही शेअर करू शकता किंवा मिळवू शकता. वायफाय नेटवर्कवर गेल्यावर तुम्हाला शेअर किंवा वायफाय क्यूआर कोडचा पर्याय दिसेल. हे केल्यानंतर, तुमच्या स्क्रीनवर QR कोड दिसू लागेल. येथे तुम्हाला WiFi पासवर्ड देखील दिसेल. आता अशा परिस्थितीत, जर एखाद्या वापरकर्त्याला वायफाय कनेक्ट करायचे असेल तर त्याला फक्त हा QR कोड स्कॅन करावा लागेल.

### आयफोन वापरकर्ते कसे कनेक्ट करू शकतात ?

जर तुम्ही आयफोन वापरकर्ता असाल तर प्रक्रिया थोडी वेगळी असणार आहे. यामध्येही सर्वप्रथम तुम्हाला सेटिंगमध्ये जावे लागेल आणि नंतर वायफाय पर्यायावर जावे लागेल. यानंतर तुम्हाला कनेक्टेड नेटवर्क पर्यायावर जावे लागेल. यामध्ये तुम्हाला एक छोटा 'i' आयकॉन दिसेल. यावर क्लिक केल्यानंतर तुम्हाला फेस आयडी किंवा टच आयडीच्या पर्यायावर जावे लागेल. हे केल्यानंतर, तुम्हाला ऑटो-जॉइन पर्यायाच्या खाली नेटवर्क पासवर्ड दिसेल. ते सेव्ह केल्यानंतर, तुम्ही ते इतर वापरकर्त्यांसोबत शेअर करू शकाल. वायफाय कनेक्शनबाबतही तुम्हाला खूप सावध राहण्याची गरज आहे. एक चूक तुम्हाला त्रास देऊ शकते. त्यामुळे वायफाय पासवर्ड शेअर करताना खूप काळजी घ्यावी लागेल.

## उठसूट कोणतेही फोटो अन् व्हिडीओ शेअर करताय?

# तुरुंगात जावे लागेल!



**सोशल मीडियाच्या युगात फोटो आणि व्हिडिओ शेअर करण्यासाठी अनेक प्लॅटफॉर्म आहेत. जिथे रोज करोडो फोटो आणि व्हिडीओ शेअर केले जातात. पण कधी कधी असे करणे महागात पडते आणि तुम्हाला तुरुंगात जावे लागू शकते. अशा परिस्थितीत, फोटो आणि व्हिडीओ ऑनलाइन शेअर करण्याचे नियम तुम्हाला माहीत असणे आवश्यक आहे, अन्यथा तुम्ही कायद्याच्या जंजाळात अडकू शकता. व्हिडीओ आणि फोटो शेअरिंगबाबत भारतात अनेक कायदे आहेत, त्यांचे उल्लंघन केल्यास तुरुंगात जावे लागू शकते. चला सविस्तर जाणून घेऊया...**

- माहिती तंत्रज्ञान कायदा २००० : हा कायदा फोटो, व्हिडिओ, इलेक्ट्रॉनिक स्वाक्षरी, कॉपी राईट्स यांसारख्या बाबी हाताळतो. जर तुम्ही वापरकर्त्यांच्या परवानगीशिवाय असे कोणतेही दस्तऐवज शेअर केले तर तुम्हाला तुरुंगात जावे लागू शकते.
- माहिती तंत्रज्ञान नियम, २०२१ : हा नियम इंटरनेट प्लॅटफॉर्मद्वारे पोस्ट केलेल्या आणि होस्ट केलेल्या सामग्रीशी संबंधित आहे. याचा अर्थ इंटरनेट प्लॅटफॉर्मला वापरकर्त्यांची गोपनीयता आणि नग्नतेची काळजी घ्यावी लागेल.
- द्वेषयुक्त भाषण कायदा, १९५६ : या कायद्यांतर्गत एखाद्याला ऑनलाइन अपमानास्पद किंवा असभ्य भाषा वापरल्याबद्दल शिक्षा होऊ शकते.
- गुन्ह्यांपासून महिलांचे संरक्षण आणि लैंगिक छळ कायदा, २०१३ : या नियमानुसार महिलांवरील लैंगिक छळ आणि लैंगिक अत्याचार हा गुन्हा आहे.

### फोटो आणि व्हिडीओ शेअर केल्यावर जेल कधी होणार ?

- एखाद्या व्यक्तीच्या गोपनीयतेचे उल्लंघन करते तेव्हा...
- कोणत्याही व्यक्तीला बदनाम करते किंवा त्यांना मानसिक वेदना देते तेव्हा...
- अश्लील भाषा किंवा लैंगिकदृष्ट्या सुस्पष्ट सामग्री पोस्ट करता तेव्हा...
- मुलांचे लैंगिक शोषण किंवा अत्याचाराचे चित्रण घडते तेव्हा...
- हिंसा किंवा द्वेषयुक्त भाषण भडकवते तेव्हा...

### तक्रार कुठे करावी ?

- जर तुम्हाला वाटत असेल की एखादा व्हिडिओ किंवा फोटो कायद्याचे उल्लंघन करत आहे, तर तुम्ही सायबर क्राईम तक्रार पोर्टलवर तक्रार करू शकता: https://cybercrime.gov.in/
- तुम्ही राष्ट्रीय महिला आयोग येथेदेखील तक्रार नोंदवू शकता. http://ncw.nic.in/
- किंवा तुमचे स्थानिक पोलिस स्टेशन.



# पासपोर्टचे ऑनलाइन नूतनीकरण कसे करावे?

**पासपोर्ट हा एक व्हर्चुअल दस्तऐवज आहे, जो राष्ट्रीय ओळखीचा पुरावा म्हणून ओळखला जातो. सुट्टी, नोकरी किंवा शिक्षणासाठी दुसऱ्या देशात जाण्यासाठी पासपोर्ट आवश्यक आहे. तथापि, पासपोर्टची वैधता देखील आहे. तथापि, पासपोर्टची वैधता १० वर्षे आहे. यानंतर पासपोर्टचे नूतनीकरण करणे आवश्यक आहे. पासपोर्टची वैधता संपण्यापूर्वी ९ महिने आधी त्याचे नूतनीकरण केले पाहिजे. तुमचे वय १८ वर्षांपेक्षा कमी असल्यास ५ वर्षांनंतर पासपोर्टचे नूतनीकरण करावे लागेल. मात्र, पासपोर्टचे नूतनीकरण सहज करता येते. त्याची प्रक्रिया जाणून घेऊया...**




### कोणती कागदपत्रे लागतील ?


- वैध पासपोर्ट
- तुमच्या वर्तमान पासपोर्टच्या पहिल्या आणि शेवटच्या पृष्ठाची छायाप्रत असणे आवश्यक आहे.
- ईसीआर/नॉन-ईसीआर पृष्ठाची स्वतः प्रमाणित छायाप्रत
- पत्त्याचा पुरावा
- वैधता विस्तार पृष्ठाची छायाप्रत
- कोणत्याही निरीक्षण पृष्ठाची स्वतः प्रमाणित छायाप्रत

### पासपोर्ट नूतनीकरण शुल्क

- १० वर्षांची वैधता असलेल्या ३६ पानांच्या पासपोर्टसाठी १५०० रुपये शुल्क भरावे लागते, तर तत्काळसाठी २००० रुपये शुल्क आकारले जाते.
- १० वर्षांच्या वैधतेच्या ६० पानांच्या पासपोर्टसाठी २००० रुपये शुल्क आकारले जाते, तर तत्काळसाठी २००० रुपये शुल्क भरावे लागते.
- १८ वर्षांखालील मुलांसाठी ५ वर्षे वैधता असलेल्या ३६ पानांच्या पासपोर्टची फी १००० रुपये आहे, तर तत्काळसाठी २००० रुपये भरावे लागतील.
- १८ वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलांसाठी १० वर्षांच्या वैधतेसह ३६ पानांच्या पासपोर्टसाठी १५०० रुपये शुल्क भरावे लागेल, तर तत्काळसाठी २००० रुपये द्यावे लागतील.

### पासपोर्टचे ऑनलाइन नूतनीकरण कसे करावे...

- पायरी १ : पासपोर्ट सेवा वेबसाइटला भेट द्या.
- पायरी २ : नोंदणी पूर्ण झाल्यास, तुमच्या आयडीने लॉग इन करा.
- पायरी ३ : लॉगिन क्रेडेन्शियल्ससह पोर्टलवर प्रवेश करा.
- पायरी ४ : यानंतर Apply for a New Passport/Re-issue of Passport पर्यायावर टॅप करा.
- स्टेप ५ : यानंतर, सर्व आवश्यक कागदपत्रे बरोबर आहेत या पर्यायावर क्लिक करा.
- पायरी ६ : नंतर पेमेंट आणि शेड्यूल पर्याय निवडा.
- पायरी ७ : यानंतर पेमेंट पूर्ण करा.
- पायरी ८ : यानंतर फॉर्म सबमिट करा.
- पायरी ९ : त्यानंतर ॲप्लिकेशन प्रिंट करण्याचा पर्याय निवडा.
- पायरी १० : यानंतर, सर्व आवश्यक कागदपत्रे आणि तुमच्या सबमिट केलेल्या अर्जासह नियोजित तारखेला जवळच्या पासपोर्ट सेवा केंद्रावर जा.



# व्हॉट्सॲप अलर्ट!

## तुमचे खाते आपोआप लॉग आउट झालेय ?

**तुम्ही जर व्हॉट्सॲप वापरत असाल तर तुमच्यासाठी एक महत्त्वाची बातमी आहे, कारण व्हॉट्सॲपमध्ये एक बग समोर आला आहे, जो व्हॉट्सॲपच्या सुरक्षेसाठी धोकादायक मानला जात आहे. या बगमुळे व्हॉट्सॲप अकाउंट आपोआप लॉग आउट होत आहे. सोशल मीडिया वापरकर्ते अनेक व्हॉट्सॲप अकाउंट्स X वर लॉग आउट झाल्याची तक्रार करत आहेत. अशा परिस्थितीत हे कसे टाळता येईल हे जाणून घेऊया ?**

### तक्रार काय आहे ?

व्हॉट्सॲप अकाऊंट लॉगआऊट झाल्याच्या बहुतांश तक्रारी डेस्कटॉपवर येत आहेत. साधारणपणे, WhatsApp खात्यातून लॉग आउट केल्यानंतर, पुन्हा लॉगिन करण्यासाठी ६ अंकी OTP आवश्यक आहे. तथापि, बगमुळे हे होत नाही. अशा परिस्थितीत हा सुरक्षेचा मोठा धोका मानला जात आहे. अँड्रॉइड, आयओएस आणि वेब यूजर्स या बगबद्दल तक्रार करत आहेत.

### संरक्षण कसे करावे ?

व्हॉट्स ॲप सपोर्ट पेजनुसार, ही सुरक्षा समस्या आहे. सध्या हा बग टाळण्यासाठी व्हॉट्सॲपकडून कोणतीही माहिती देण्यात आलेली नाही. तथापि, तुम्ही तुमच्या सुरक्षिततेसाठी टू फॅक्टर ऑथेंटिकेशन प्रोसेस अवलंबू शकता.



### टू फॅक्टर ऑथेंटिकेशन कसे चालू करावे ?

- सर्व प्रथम WhatsApp उघडा. यानंतर सेटिंग ऑप्शनवर टॅप करा.
- त्यानंतर तुम्हाला अकाउंट ऑप्शनवर टॅप करावे लागेल.
- यानंतर तुम्हाला टू फॅक्टर ऑथेंटिकेशन पर्यायावर टॅप करावे लागेल.
- यानंतर खाते सुरक्षित करण्यासाठी ६ अंकी कोड टाकावा लागेल.
- यासोबतच ईमेल टाकावा लागेल आणि ईमेलची पडताळणी करावी लागेल.
- यानंतर, जेव्हा तुमचे व्हॉट्सॲप खाते लॉग आउट होईल, तेव्हा तुम्हाला सिक्युरिटी पिन टाकावा लागेल.

## फोन हॅकिंग : फोनवर हे 8 चिन्ह दिसले तर होतेय हेरगिरी!




**इंटरनेटच्या जमान्यात फोन हॅक होण्याच्या घटना वाढल्या आहेत. तसेच, प्रत्येक क्षेत्रात तंत्रज्ञानाचा प्रवेश होत आहे, त्यामुळे फोन हॅक करणे सोपे झाले आहे. अशा परिस्थितीत, तुमचा फोन हॅक झाला आहे हे तुम्हाला कसे कळेल ? खरं तर, आज आम्ही तुम्हाला काही चिन्हे सांगणार आहोत, ज्याद्वारे तुम्ही समजू शकता की तुमचा फोन हॅक झाला आहे...**

- बॅटरी आयुष्य : जर तुमच्या फोनची बॅटरी लवकर डिस्चार्ज होत असेल, तर तुमचा फोन हॅक झाला असण्याची शक्यता आहे. कारण काहीवेळा बॅकग्राउंडमध्ये चालणाऱ्या हेर ॲप्समुळे फोनची बॅटरी लवकर डिस्चार्ज होते. अशा परिस्थितीत फोनच्या बॅटरीकडे लक्ष देण्याची गरज आहे.
- फोनवर अनावश्यक ॲप्स : तुम्ही तुमच्या फोनमध्ये ॲप्सचा तपशील ठेवावा. जेणेकरून तुमच्या परवानगीशिवाय तुमच्या फोनवर कोणतेही ॲप इंस्टॉल होणार नाही. असे झाल्यास फोन हॅक होऊ शकतो. या अज्ञात ॲप्समध्ये गुप्तचर सॉफ्टवेअर असू शकते.
- डिव्हाइस जास्त गरम करणे : हेरगिरी करणारे ॲप्स सहसा यासाठी जीपीएस प्रणाली वापरून रिअल टाइममध्ये डिव्हाइसचे स्थान ट्रॅक करतात. अशा परिस्थितीत तुमच्या फोनच्या हार्डवेअरवर जास्त दबाव येतो. त्यामुळे जास्त गरम होण्याची समस्या उद्भवते.
- डेटा वापरात वाढ : जर तुमचा फोन ट्रॅक केला असेल तर डेटाचा वापर अचानक वाढतो. अशा परिस्थितीत डेटा वापरात अचानक वाढ होत असेल, तर तुम्ही सतर्क राहायला हवे.
- डिव्हाइस खराबी : जेव्हा फोन हॅक होतो, तेव्हा स्क्रीन फ्लॅशिंग, स्वयंचलित फोन सेटिंग्ज बदलणे किंवा फोन काम करत नाही, डिव्हाइस खराब होणे यासारख्या घटना दिसू शकतात.
- कॉल करताना पार्श्वभूमी आवाज : काही गुप्तचर ॲप्स फोन कॉल रेकॉर्ड करतात. अशा परिस्थितीत, जेव्हा फोन कॉल दरम्यान कोणताही पार्श्वभूमी आवाज ऐकू येतो तेव्हा एखाद्याने सावध राहावे, कारण हे हॅकिंगचे लक्षण असू शकते.
- अनावश्यक ब्राउझिंग हिस्ट्री : ट्रॅकिंग किंवा गुप्तचर अनुप्रयोग डाउनलोड करण्यासाठी लिंक केलेल्या वेबसाइट शोधण्यासाठी आपल्या डिव्हाइसच्या ब्राउझिंग इतिहासाचे निरीक्षण करा.

## शॉर्ट न्यूज

### अपघातात ६१ वर्षीय वयोवृद्ध जागीच ठार

**गुहा :** शिर्डीकडून शनिशिंगणापूरकडे परराज्यातील भाविक घेऊन चाललेल्या इर्टीगा कारने फॅक्टरीकरून लोणीकडे जात असलेल्या दुचाकीस जोराची धडकी दिली. ही घटना राहुरी तालूक्यातील गुहा परिसरात घडली. या धडकेत दुचाकी चालक राहुरी फॅक्टरी वृंदावन कॉलनी जवळील आरंगळे वस्तीवरील रहिवासी रंगनाथ गंगाधर आरंगळे, वय ६१ वर्षे यांचा जागीच मृत्यू झाला. तर दुचाकीवर पाठीमागे बसलेले शंकर रामचंद्र शिंदे हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सूरू आहेत. मयत रंगनाथ आरंगळे यांच्या निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

### अजित पवार गटाकडून तनपुरे विरोधात उमेदवार

**राहुरी :** विधानसभा मतदार संघात राष्ट्रवादीची मोठी ताकद आहे. त्यामुळे सक्षम उमेदवार देत राष्ट्रवादी अजित पवार गट राहुरीमध्ये आपला उमेदवार देणार. मात्र उमेदवार कोण हे ऐनवेळी समजणार आहे. असे खा. सुनील तटकरे यांनी राहुरी येथे कार्यकर्त्यांना भेट दिली असता पत्रकारांशी संवाद साधताना सांगितले. सायंकाळी नगरहून शिर्डीकडे जात असताना राहुरी येथील राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष सुनील भट्टड यांच्या कार्यालयात भेट दिली. तेव्हा खा. तटकरेंनी जिल्ह्यात सहा जागा लढविण्याचा निर्धार करण्यात आला असल्याचे म्हटले आहे.

### पाचेगावात पाऊण तास जोरदार पाऊस

**नेवासा :** तालुक्यातील पाचेगाव व पुनतगाव मध्ये आर्द्रा नक्षत्राच्या पावसाने हजेरी लावली. सुमारे पाऊणतास पडलेल्या या पावसाने सोयाबीन, कपाशी आदी पिकांना जीवदान दिले. खरीप हंगामातील पेरण्या व लागवडी पूर्ण होऊन शेतकरी मोठ्या पावसाची वाट पाहत होते. २० जून रोजी नक्षत्र बदलत आर्द्रा नक्षत्र सुरू झाले. दिवसभर वारा व दमट हवामान असल्याने सायंकाळी पाऊस पडेल अशी आशा शेतकऱ्यांना वाटत होती. सायंकाळी पाचच्या सुमारास पावसाने हजेरी लावत खरीप हंगामातील पिकांना जीवदान दिले.

### राहाता बाजार समितीत कांद्याला ३२०० रुपये भाव

**राहाता :** बाजार समितीत कांद्याला जास्तीत जास्त ३२०० रुपये भाव मिळाला. कांद्याच्या एकूण १२६२९ गोण्यांची आवक झाली. कांदा नंबर १ ला २६०० ते ३२०० रुपये भाव मिळाला. नंबर २ ला १९०० रुपये ते २५५० रुपये भाव मिळाला. नंबर ३ ला ११०० रुपये ते १८५० रुपये. गोल्टी कांदा २२०० रुपये ते २४०० रुपये. जोड कांदा ५०० ते १००० रुपये. यात ६१ गोण्यांना ३२०० रुपये, ११९ गोण्यांना ३१०० रुपये तर ३७७ गोण्यांना ३००० रुपये प्रतिक्विंटलला भाव मिळाला.

### खर्डा येथील ग्रामस्थ आंदोलनाच्या तयारीत

**खर्डा :** शहरातील जुनी ग्रामपंचायत (कमेटी) ही जीर्ण झालेली धोकादायक इमारत कधीही पडू शकते. सदर इमारत धोकादायक असल्याचे २०२१ च्या मासिक मीटिंगमध्ये त्यावेळेस बहुमताने ही इमारत पाडण्याचा ठराव घेण्यात आला होता. त्याच वेळी जिल्हा परिषद कडून इमारत धोकादायक असल्याचे निर्लेखन पत्र ग्रामपंचायतने आणले होते, गेली चार वर्षे झाले अंतर्गत राजकीय विरोधामुळे धोकादायक इमारत पाडण्यास ग्रामपंचायत प्रशासन दुर्लक्ष करीत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

# खुनाचा प्रयत्न प्रकरणातील पसार आरोपीला साताऱ्यातून अटक

## पैशांच्या व्यवहारातून झाला होता वाद

**नगर : प्रतिनिधी**

**खुनाचा प्रयत्न करून एकाला गंभीर जखमी करणारा आरोपी पसार झाला होता. त्या आरोपीला एमआयडीसी पोलिसांनी सातारा जिल्ह्यातील साकुर्डी येथून जेरबंद केले. निखिल शिवाजी गांगर्डे (वय २६, रा. दत्तनगर, वडगाव गुप्ता, ता. नगर) असे अटक आरोपीचे नाव आहे.**



१५ एप्रिल रोजी रात्री दहा वाजेच्या सुमारास अशोक श्रीधर शेळके यांना शेंडी बाह्यवळण रस्त्यावरील डोंगरे वस्तीजवळ त्यांच्या ओळखीचा निखिल गांगर्डे भेटला. अशोक शेळके व निखिल गांगर्डे यांचा पैशाच्या व्यवहारातून वाद झाला. त्यातून निखिल गांगर्डे याने अशोक शेळके यांच्यावर चाकूने वार केला. त्यामुळे अशोक शेळके गंभीर जखमी झाले. या प्रकरणी तुषार अशोक शेळके याने एमआयडीसी पोलीस ठाण्यात निखिल गांगर्डे विरोधात फिर्याद दिली. त्यानुसार एमआयडीसी पोलिसांनी खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल करून घेतला होता.

या प्रकरणातील आरोपीचा एमआयडीसी पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक माणिक चौधरी शोध घेत असताना त्यांना माहिती मिळाली की, आरोपी निखिल गांगर्डे हा सातारा जिल्ह्यात आहे. त्यानुसार सहायक पोलीस निरीक्षक चौधरी यांनी पोलीस पथक साताऱ्याला रवाना केले. त्यानुसार पथकाने शोध घेऊन साकुर्डी (ता. कराड) येथून आरोपी गांगर्डेला अटक केली.

## वाचकांच्या लेखणीतून

### हम उसका दिल, उसका जिगर देखते हैं!



अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या वतीने घेण्यात आलेल्या परीक्षेत शुभम वाघमारे याची पुरवठा निरीक्षकपदी निवड झाल्याचे कळले. शुभम हा पारनेर तालुका पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष संजय वाघमारे यांचा पुत्र, तर पारनेर दर्शनचे कार्यकारी संपादक विजय वाघमारे यांचा पुतण्या होय. परंतु आपल्या घराण्याचा लौकिक सांगून कोणीही मोठा होत नसतो.

**इनायत की जिस पर नज़र देखते हैं ।
हम उसका दिल,उसका जिगर देखते हैं।।**

जिगर मुरादाबादी म्हणतात, कृपेची ज्याच्यावर दृष्टी आहे अशाचे काळीज, त्याचे साहस आम्ही बघतो.

संरक्षण शास्त्र (डिफेन्स सायन्स) आणि तत्त्वज्ञान (फिलॉसॉफी) या विषयांमध्ये पहिल्याच प्रयत्नात नेट आणि सेट परीक्षा शुभमने उत्तीर्ण केल्या. उत्तर कोरियातील विद्यापीठाने शुभमला फेलोशिप प्रदान केली होती, असेही कळते.

आपल्या पारनेर तालुक्यासारख्या ग्रामीण भागातील नवयुवक शुभम वाघमारे याच्या मेहनतीला, हिमतीला आणि धाडसाला आपण सलाम केला पाहिजे.

**नाना ढवळे**
८२८६९१३२२३
निघोज, ता. पारनेर,
जि. अहमदनगर.

# शेतीमाल व दुग्धजन्य पदार्थांच्या शाश्वत निर्यातीसाठी प्रयत्नशील

## राष्ट्रीय डेअरी विकास बोर्डाचे चेअरमन मिनेश शाह यांचे आश्वासन

**कोपरगाव : प्रतिनिधी**

**दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या उत्कर्षासाठी त्यांना चांगल्या दर्जाचे बियाणे उपलब्ध करून देऊन सेंद्रीय कृषी उत्पादन वाढवण्याबरोबर त्या उत्पादित मालाला देशाच्या बाहेर शाश्वत बाजारपेठ निर्माण करून देण्यासाठी राष्ट्रीय डेअरी विकास बोर्ड अर्थात एन. डी. डी. बी. पुढाकार घेईल, असे प्रतिपादन एनडीडीबीचे चेअरमन मिनेश शाह यांनी केले.**



कोपरगाव तालुक्यतील गोदावरी खोरे नामदेवरावजी परजणे पाटील तालुका सहकारी दूध उत्पादक संघाचे संस्थापक दिवंगत नेते नामदेवराव परजणे पाटील यांच्या २० व्या स्मृतिदिनानिमित्त संघाच्या कार्यस्थळावर आयोजित विविध प्रकल्पांच्या उद्घाटनप्रसंगी शाह बोलत होते. याप्रसंगी महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघाचे व्यवस्थापकीय संचालक अनिल हातेकर, बँक ऑफ इंडिया नाशिकच्या झोनल मॅनेजर जयश्री देशमुख, एनडीडीबी मुंबई येथील फायनान्स विभाग मुख्य व्यवस्थापक स्वाती श्रीवास्तव, लातूर जिल्हा सहकारी दूध संघाचे अध्यक्ष राजेंद्र सूर्यवंशी, बायफ संस्थेचे राज्य कार्यक्रम प्रमुख सुधीर वागळे, संघाचे कार्यकारी संचालक चंद्रकांत गाढवे यांची प्रमुख उपस्थिती होती. संघाचे अध्यक्ष राजेश परजणे पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले.

गोदावरी दूध संघाने नव्याने उभारलेल्या लोकनेते नामदेवरावजी परजणे पाटील शॉपिंग कॉम्प्लेक्समधील शेतकरी भवनाच्या उद्घाटनासह संघ कार्यस्थळावर फ्लेवर मिल्क पॅकींग स्टरलायझर मशिनचा शुभारंभ, मुरघास प्रकल्प, पाणीवाटप टँकर्सचा शुभारंभ, आंब्याच्या रोपांचे वितरण असे विविध कार्यक्रम पार पडले. याशिवाय संघाला सर्वाधिक दूध पुरवठा करणाऱ्या संस्था, सर्वाधिक दर देणाऱ्या संस्था, उत्तम गुणप्रतीचे व विनानाश दूध पुरवणाऱ्या संस्थांचा मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. दूध उत्पादकांसाठी श्रीनामदेवराव परजणे पाटील पशुपालक सुरक्षा १० लाखांचा अपघाती / अपंगत्व विमा योजनेचा शुभारंभही यावेळी करण्यात आला.

राजेश परजणे म्हणाले, दुग्धव्यवसायात सहकारी आणि खासगी अशी मोठी स्पर्धा वाढली आहे. प्रामाणिकपणे व्यवसाय करणारे शेतकरी स्पर्धेत भरडले जात आहेत. विविध प्रकारची अमिषे दाखवून त्यांना फसवले जात आहे. सहकारी संस्थांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे सांगून याबाबी पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय सहकारमंत्री अमित शाह यांच्या निदर्शनास आणून देऊन काही ठोस धोरणे राबवण्याच्या दृष्टीने आपण पुढाकार घ्यावा, अशी मागणी परजणे यांनी राष्ट्रीय डेअरी विकास बोर्डचे अध्यक्ष मिनेश शाह यांच्याकडे केली. संघाचे संचालक विवेक परजणे यांनी आभार व्यक्त केले.

# भंडारदरा धरणातील पाणीसाठा १२ टक्क्यांवर ; धरणात पाण्याची आवक वाढली

**भंडारदरा : प्रतिनिधी**

**भंडारदरा पाणलोट क्षेत्रात पाऊस बरसत असल्याने धरणात पाण्याची आवक वाढत आहे. काल सायंकाळी भंडारदरा धरणातील पाणीसाठा १२ टक्क्यांवर पोहचला असून १० मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे.**



उत्तर नगर जिल्ह्याला वरदान ठरलेल्या भंडारदरा धरणाची क्षमता ११०३९ दलघफू आहे. यंदा ९ टक्के साठा असलेल्या धरणाचा पाणीसाठा १३५१ (१२ टक्के) दलघफूवर पोहचला आहे. घाटघर, पांजरे आणि रतनवाडीत पाऊस सुरू असल्याने धरणात पाण्याची आवक होत आहे. अधून-मधून पडणार्या पावसामुळे पाणलोट हिरवागार होऊ लागला आहे. पावसाळी वातावरण टिकून असल्याने गारवा निर्माण झाला आहे.

SACCHIDANAND CAREER INSTITUTE
Parner Public School
G.M INTERNATIONAL SCHOOL PARNER
ADMISSIONS OPEN 2024-25
प्रवेश सुरू २०२४-२५
PARNER PUBLIC SCHOOL
LKG, UKG, STD 1st
State Board
11th Science (State Board & NCERT Syllabus)
Integrated with NEET & MHT-CET
MHT-CET (Engg., NATA, Architecture, NDA, Other Entrance)
NEET (Medical, Agri, Pharmacy, Other Entrance)
G. M. INTERNATIONAL SCHOOL
LKG, UKG, STD 1st to 5th
CBSE Board

सुरभि हॉस्पिटल, अहमदनगर येथील
स्त्रीरोग तज्ज्ञ आपल्या परिसरामध्ये
प्रत्येक बुधवारी भाळवणी येथे वेळ 10 ते दुपारी 2
डॉ. सुलभा पवार
एम.बी.बी.एस. (बी.जे. पुणे), डि.जी.ओ. (मुंबई)
स्त्री आरोग्य तज्ज्ञ
प्रसूती विभाग
- प्रसूती पूर्व तपासणी
- संपूर्ण प्रसूती उपचार
- अति जोखमेचे बाळंतपण (High Risk Pregnancy)
गर्भपिशवीचे आजार
- अंगावरून पांढरे किंवा लाल जाणे
- गर्भपिशवी मध्ये असणाऱ्या गाठी
- गर्भपिशवीच्या मुखांचे आजार
Infertility वंधत्व उपचार
- वारंवार होणारे गर्भपात,
- लग्नानंतर अनेक वर्ष गर्भधारणा न होणे,
- पहिल्या गर्भधारणेनंतर दुसऱ्या गर्भधारणेला अडचण येणे,
- टेस्ट ट्यूब बेबी (IVF) किंवा IUI उपचार
स्तनांचे आजार आणि उपचार
PCOS आणि मासिक पाळीच्या समस्या
सरकारमान्य गर्भपात आणि कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया
सर्व शस्त्रक्रिया ॲडव्हान्स लॅप्रोस्कोपी सर्जरीद्वारे
(म्हणजेच बिन टाक्याच्या आणि दुर्बिणीच्या)
पत्ता: डॉ. मते यांचे नित्यसेवा हॉस्पिटल, भाळवणी, ता. पारनेर
नाव नोंदणीसाठी संपर्क: 9545257575, 7030939211

नोंदणी क्र. महा. ३९६/२२
जय नेताजी मल्टीपर्पज एज्युकेशन ट्रस्ट, संचलीत
न्यु सह्याद्री अकॅडमी
स्वप्न तुमचे मार्गदर्शन आमचे
मुला-मुलींसाठी राहण्याची व जेवणाची उत्तम व्यवस्था
एकदा या बघा खात्री करा व मगच प्रवेश घ्या...!
आर्मी / पोलीस भरती व सरळ सेवा परीक्षेतील भरघोस यश नंतर MPSC च्या क्षेत्रात दमदार पदार्पण
MPSC FOUNDATION COURSE
PSI | STI | ASO | TAX ASST |
MPSC लिपीक
NEW BATCH STARTING
ADMISSION OPEN
निवासी/अनिवासीची सोय
स्वतंत्र मुलींची बॅच
मेजर भगवान नांगरे सर
आमची वैशिष्ट्ये
- १ डिसेंबर पासुन नवीन बॅचला सुरुवात
- एकदम डिजीटल पद्धतीने लेक्चर हॉल
- प्रत्येक विषयाला अनुभवी शिक्षक
- मुलींसाठी व मुलांसाठी स्वतंत्र होस्टेल व मेस सुविधा
- अत्याधुनिक व सुसज्य अशी अभ्यासिका
- PSI या पदासाठी स्वतंत्रपणे ग्राऊंडची व्यवस्था
- पहिले ५ दिवस फ्रि डेमो लेक्चर
ॲडमिशन ओपन
9850046500 | 9834935396 | 9822821095
आमचा पत्ता : स्टारलाईट कंपनी समोर, बडोदा बँक शेजारी, बजाजनगर, छत्रपती संभाजीनगर

# माजी विद्यार्थी वाघमारे व भालेकर यांची अधिकारीपदी निवड

## न्यू इंग्लिश स्कूलच्या वतीने गौरव



पारनेर येथील न्यू इंग्लिश स्कूलचा माजी विद्यार्थी शुभम वाघमारे याची पुरवठा निरीक्षकपदी तर रणजित भालेकर याची इंडियन कोस्ट गार्डमध्ये आसिस्टंट कमांडट पदी निवड झाल्याबद्दल त्यांना विद्यालयाच्या वतीने गौरवण्यात आले.

पारनेर : प्रतिनिधी

**पारनेर येथील जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज या संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूलचा माजी विद्यार्थी शुभम वाघमारे याची पुरवठा निरीक्षकपदी तर रणजित भालेकर याची इंडियन कोस्ट गार्डमध्ये आसिस्टंट कमांडट पदी निवड झाल्याबद्दल त्यांना विद्यालयाच्या वतीने गौरवण्यात आले.**

सोमवारी (दि. २४ जून) रोजी विद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या मनिषा गाडगे यांच्या हस्ते शुभम व सिध्दांत यांचा सत्कार करण्यात आला. क्रीडा शिक्षक बापूराव होळकर,आर.टी.ओ. पद्माकर भालेकर,सतीष फापाळे,जयवंत पुजारी,अजित दिवटे,संतोष ठाणगे,अजित लंके,मनिषा जगदाळे यावेळी उपस्थित होते.

यावेळी बोलताना प्राचार्या गाडगे म्हणाल्या की ,शुभम वाघमारे व रणजित भालेकर यांनी विद्यालयाच्या गौरवात भर घातली आहे.त्यांचा आदर्श विद्यार्थ्यांनी घ्यावा. शुभमने पुरवठा निरीक्षक पदाला तर रणजितने असिस्टंट कमांडंट पदाला परिश्रमपूर्वक गवसणी घातल्याचे श्रीमती गाडगे म्हणाल्या.आपल्या विद्यालयातील अधिकाधिक विद्यार्थी अधिकारी व्हावेत, विविध खेळांमध्ये चमकावेत,शाळेचा नावलौकिक त्यांनी वाढवावा या अपेक्षेने विद्यालयाचे सर्व शिक्षक परिश्रम घेत असतात.

शिक्षकांच्या परिश्रमांना विद्यार्थ्यांनी प्रयत्नांची जोड दिली तर यश नक्कीच मिळते.विद्यार्थ्यांना मिळालेले यश जसे शाळेच्या शिरपेचात तुरा रोवणारे असते तसेच शिक्षकांसाठीही अभिमानास्पद असल्याचे प्राचार्या गाडगे म्हणाल्या. आर.टी.ओ.पद्माकर भालेकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.सूत्रसंचालन मंगल बनकर यांनी केले तर आभार जयवंत पुजारी यांनी मानले.कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक व सेवक वृंद यांनी परीश्रम व सहकार्य केले.

### स्पर्धा परीक्षेचा पाया शाळेतच भक्कम

न्यू इंग्लिश स्कूलमध्ये माध्यमिक शिक्षणाचा पाया भक्कम झाल्यामुळे विविध स्पर्धा परीक्षांना तोंड देणे सोपे झाले.माध्यमिक शिक्षणाचा पाया पक्का असल्याने स्पर्धा परीक्षांना आत्मविश्वासाने सामोरे जाता आले. शाळेने केलेला माझ गौरव ही माझ्या आणि माझ्या कुटुंबाच्या दृष्टीने अभिमानाची बाब आहे.माझ्या यशात माझ्या न्यू इंग्लिश स्कूल या शाळेचा सिंहाचा वाटा आहे. शिक्षकांनी केलेले मार्गदर्शन मी कधीही विसरू शकणार नाही.शिक्षक आणि शाळेविषयी मी कृतज्ञ आहे.

**शुभम वाघमारे**
पुरवठा निरीक्षक.

### दीर्घ अपयशानंतरही अभ्यासात सातत्य

नौदलामध्ये अधिकारी होणे हे माझे स्वप्न होते त्यासाठी पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केल्यानंतर संरक्षण विभागाच्या परीक्षा देण्यास सुरुवात केली .कोस्ट गार्ड मधील अधिकारी पदाच्या परीक्षा दिल्या .९ वर्ष खडतर परीश्रम घेत १४ परीक्षा व १४ मुलाखती दिल्या. माझ्या पालकांनी दाखविलेला विश्वास, केलेले संस्कार माझ्या यशासाठी कामी आले. दिर्घ अपयशानंतरही अभ्यासात सातत्य राखल्याने तसेच पालकांचे पाठबळ मोलाचे ठरले.

**रणजित भालेकर**
असिस्टंट कमांडंट.

# शेतकऱ्यांनो एक रुपयात पीक विम्याचा लाभ घ्या

## ■ तालुका कृषी अधिकारी घुले यांचे आवाहन ■ १५ जुलै अंतिम मुदत

सुपा : प्रतिनिधी




**विविध नैसर्गिक आपत्तीमुळे पिकांच्या होणाऱ्या नुकसानी पासून पारनेर तालुक्यातील शेतकऱ्यांना आर्थिक संरक्षण देण्याच्या दृष्टीकोनातून प्रधानमंत्री पीक विमा योजनेमध्ये शेतकऱ्यांनी एक रुपया विमा हफ्ता भरून सहभागी करून घेण्याची योजना राबविण्यात येत आहे. या योजनेत शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन पारनेर तालुका कृषी अधिकारी गजानन घुले यांनी केले आहे.**

पारनेर तालुका कृषी विभाग आगामी खरीप हंगामासाठी सज्ज झाला आहे. खरिपातील विविध पिकांसाठी बियाणे, खते, औषधे, यांची मागणी नोंदवून हंगामाच्या पूर्व तयारीला सुरवात करण्यात आल्याची माहिती पारनेर तालुका कृषी अधिकारी घुले यांनी दिली. पारनेर तालुका क्षेत्रफळाने मोठा आहे. शेतीला जोड व्यवसाय म्हणून दूध व कुक्कुटपालन ही केले जाते. तालुक्यातील शेती सिंचनासोबतच पावसावर अवलंबून आहे. या ठिकाणी खरीप व रब्बी हंगामा सोबत काही क्षेत्र बारामाही बागायती आहे. साधारणपणे जून महिन्यात खरीप हंगामाच्या पेरण्यांना सुरुवात होते.

प्रधानमंत्री पिक विमा योजनेत शेतकऱ्यांना एक रुपया विमा हप्ता भरून सहभागी करून घेण्याचा निर्णय राज्य सरकारने २०२३ मध्ये घेतला आहे. विविध नैसर्गिक आपत्तीमुळे पिकांच्या होणाऱ्या नुकसानी पासून शेतकऱ्यांना आर्थिक संरक्षण देण्याच्या दृष्टिकोनातून ही योजना राबविण्यात येत आहे. त्यामुळे चालू वर्षीही या योजनेत शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन पारनेर तालुका कृषी अधिकारी यांनी केले आहे. या योजनेत सहभागासाठी अंतिम मुदत १५ जुलै आहे. सध्या खरीप २०२४- २५ या हंगामात पेरण्या सुरू झाल्या आहेत.


योजनेमध्ये समाविष्ट पिकांमध्ये प्रामुख्याने मालकीच्या ई पीक नोंद असलेल्या अधिसूचित बाजरी, भुईमूग, सोयाबीन, मूग, उडीद, तुर, व खरीप कांदा पिकांसाठी अधिसूचित क्षेत्रातील शेतकऱ्यांना भाग घेता येईल. शेतकऱ्यांना पीक विमा भरण्यासाठी आधार क्रमांक आवश्यक आहे. आधार कार्ड वरील नाव व बँक खात्यावरील नाव सारखेच असावे तरच विमा योजनेची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होईल अशी माहिती कृषी विभागाच्या वतीने देण्यात आली.

# मनाच्या एकाग्रतेसाठी योगा उपयुक्त - प्राचार्य बी.एस.राऊत

सुपा : प्रतिनिधी

**सध्याच्या धकाधकीच्या जीवनामध्ये वाढते ताण तणाव यामुळे मनाची एकाग्रता भंग पावते. मनाच्या एकाग्रतेसाठी योगासने आणि प्राणायाम उपयुक्त असल्याचे प्राचार्य बी. एस.राऊत यांनी सांगितले.**

रयत शिक्षण संस्थेच्या सुपे येथील न्यू इंग्लिश स्कुलमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. आंतरराष्ट्रीय पातळीवर आयोजित करण्यात येणाऱ्या यंदाच्या दहाव्या योग दिनानिमित्त न्यू इंग्लिश स्कुलमध्ये विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रभारी प्राचार्य बी.एस. राऊत हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. क्रीडा शिक्षक बी.जी.शिंदे यांनी योगदिनाची विद्यार्थ्यांना सविस्तर माहीती दिली.



यावेळी बोलताना प्राचार्य बी.एस.राऊत यांनी सांगितले की, योगासने व प्राणायाम यांचे आपल्या जीवनात अनन्यसाधारण महत्व आहे. ते म्हणाले, फोनच्या वापरामुळे विद्यार्थांमधीली एकाग्रता कमी झाल्याचे दिसून येते. मनाची एकाग्रता वाढवून आपणाला शैक्षणिक उदिदष्ट साध्य करायचे असेल तर योगासने व प्राणायम यांची अत्यंत आवष्यकता आहे. योग दिनाच्या निमित्ताने शिकविण्यात आलेली योगासने व प्राणायम यांचा सातत्याने अभ्यास करून आपले शरीर निरोगी व जीवन आनंददायी करावे असे आवाहन प्राचार्य राऊत यांनी यावेळी केले.

यावेळी विद्यालयाचे शिक्षक एस.पी.येणारे, एस.आर. बर्वे, पी. डी.पळसकर यांनी विद्यार्थ्यांना योगासने व प्राणायाम यांची प्रात्यक्षीके करून दाखविले. त्याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शनही करण्यात आले. यावेळी विद्यालयातील सर्व विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. श्रीमती एस. बी. पाडेकर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# श्रीगोंद्याच्या प्रियंकाने संसद भवनात दिले योगाचे धडे !

## श्रीगोंदेकरांसाठी अभिमान

श्रीगोंदा : प्रतिनिधी



**श्रीगोंदे तालुक्यातील घारगाव येथील बापूराव शिंदे यांची कन्या प्रियंका हिने आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त दिल्लीच्या संसद भवनामध्ये योगाभ्यासाचे धडे दिले.**

लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांच्यासह खासदार तसेच संसदेचे उच्च पदस्थ अधिकारी या योगाभ्यासात सहभागी झाले होते. वयाच्या अवघ्या २१ व्या वर्षी प्रियंका हिने केलेल्या या कामगिरीचा श्रीगोंदेकरांना अभिमान आहे.

प्रियंका हि नॅशनल योगा चॅम्पियन असून तीन वयाच्या अवघ्या विसाच्या वर्षी योगा क्षेत्रात देशभरात आपले नाव कमावले आहे. शालेय जीवनापासूनच प्रियंका हिने योगाभ्यासाची आवड जपलेली आहे.

प्रियंका ही दिल्ली येथील देशातील एकमेव सरकारी योग संस्था असलेल्या मोरारजी देसाई राष्ट्रीय महाविद्यालयात योगाचे शिक्षण घेत आहे. भविष्यात योग क्षेत्रात उच्च शिक्षण घेऊन योगगुरू होण्याचे तिचे स्वप्न आहे. संसद भवना खासदरांना योगाभ्यासाचे धडे देऊन प्रियंका हिने नगर जिल्हयाचे नाव उंचावले असून तिच्या या असामान्य कामगिरीबद्दल जिल्हाभरातून तिच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# राळेगणसिध्दीतील पाणलोटाची अण्णांकडून पाहणी

## सोमवारी दमदार पावसाची हजेरी

राळेगणसिध्दी : प्रतिनिधी

**पाणलोट क्षेत्र विकासासाठी आग्रही असलेल्या ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी सोमवारी राळेगणसिध्दीत दमदार पाऊस झाल्यानंतर अण्णांनी राळेगणसिध्दीतील विविध पाणलोट क्षेत्रांची पाहणी करून समाधान व्यक्त केले.**



सैन्यदलातून निवृत्त झाल्यानंतर हजारे यांनी गावाच्या विकासासाठी वाहून घेतले. गावाची आर्थिक नाडी असलेल्या शेती व्यवसायास भरभराट आणण्यासाठी पाणलोट क्षेत्र विकास करून जमीनीतील पाण्याची पातळी वाढली पाहिजे, पावसाच्या पाण्यासोबत वाहून जाणारी शेतातील माती शेतामध्येच राहिले पाहिजे असा मंत्र घेउन हजारे यांनी पाणलोट क्षेत्र विकासाचे राळेगणसिध्दीमध्ये काम केले. त्याचे दृष्य परिणाम पहावयास मिळत असून राज्य, देश नव्हे तर जगभरातून पाणलोटाचे अभ्यासक हजारे यांचे हे काम पाहण्यासाठी राळेगणसिध्दीस भेट देतात. अण्णांचे मार्गदर्शन घेतात.

पर्जन्यछायेखाली असलेल्या पारनेर तालुक्यामध्ये जुन महिन्यात मान्सूनची फारशी हजेरी लागत नाही. यंदा मात्र ९ जुन रोजी राळेगणसिध्दीसह तालुक्याच्या अनेक भागात दमदार पावसाने हजेरी लावली. याच पावसाच्या जोरावर शेतकऱ्यांनी खरीपाच्या पिकांची पेरणीही केली. त्यानंतर मात्र पावसाने काहीशी ओढ दिल्याने शेतकरी वर्गात चिंतेचे वातावरण होते. उगवून आलेली पिके सुकू लागली होती. मात्र सोमवारी सायंकाळी पावसाने दमदार हजेरी लावली. त्यामुळे राळेगणसिध्दीमधील बंधारे, पाझर तलाव, विहीरी भरल्या. ओढयालाही पुर केला. अण्णांनी मोठया कष्टाने उभे केलेल्या पाणलोटाच्या कामाचे दृश्य परिणाम पावसाळयात दिसतात. असेच परिणाम विविध पाणलोटांमध्ये दिसू लागल्यानंतर अण्णांनी विविध पाणलोटांना भेटी देत समाधान व्यक्त केले.

हजारे यांच्यासमवेत विश्वस्त लक्ष्मण मापारी, दत्ता आवारी, राजाराम गागरे, रामदास सातकर तसेच शेतकरी उपस्थित होते.

# रस्त्यावर कचरा टाकाल तर दंडात्मक कारवाई; निघोज ग्रामपंचायतीचा इशारा

निघोज : प्रतिनिधी

**तालुक्यातील सर्वात मोठी ग्रामपंचायत म्हणून ओळख असलेल्या निघोजची लोकसंख्याही अर्थातच जास्त आहे. परिणामी व्यवसायीकांची संख्याही मोठी असून विविध व्यवसायीक दररोजचा कचरा घंटागाडीत न टाकता रस्त्यावर टाकत असल्याचे चित्र आहे. यापुढील काळात रस्त्यावर कचरा टाकून अस्वच्छता करून आरोग्याच्या समस्या निर्माण करणाऱ्या व्यवसायीकांना साडेचार हजार रूपये दंड करण्याचा इशारा ग्रामपंचायतीच्या वतीने देण्यात आला.**



रस्त्यावर कचरा टाकल्यामुळे निर्माण होणाऱ्या समस्यांच्या पार्श्वभुमीवर निघोजमधील व्यवसायीकांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

यासंदर्भात माहीती देताना सचिन वराळ यांनी सांगितले की, खाद्यपदार्थ विक्रेते, हॉटेल व्यवसायीकांकडून तसेच गावातील नागरीकांचा कचरा संकलीत करण्यासाठी ग्रामपंचायतीच्या वतीने घंटा गाडीची सोय करण्यात आली असून ही गाडी दररोज प्रत्येक प्रभागात फिरते. मात्र विशेषत: अनेक व्यवसायीक घंटागाडीमध्ये कचरा टाकण्याची तसदी न घेता रस्त्यावर विशेषत: स्मशानभुमीलगतच्या पुलावर टाकून देतात.

माता मळगंगा देवीच्या मंदिरामुळे निघोजची महती देशभर आहे. दररोज अनेक भाविक निघोजला भेट देतात. त्यांच्यापुढे या अस्वच्छतेचे, दुर्गंधीचे प्रदर्शन करणे योग्य नाही. शिवाय या कचऱ्यामुळे निर्माण होणारे आरोग्याचे प्रश्नही तितकेच महत्वाचे असल्याचे वराळ म्हणाले.

निघोजमध्ये होणाऱ्या अस्वच्छतेच्या पार्श्वभुमीवर मच्छि व मटन व्यवसायीकांच्या बैठकीचे उपसरपंच ज्ञानेश्वर वरखडे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजन करण्यात आले होते. बैठकीस मंगेश लाळगे, अस्लम इनामदार, ईम्तीयाज मोमीन, मुन्ना मोमीन, अन्वर मोमीन, संदीप कवाद, कासम मोमीन, सलमान इनामदार, मुदस्सर सय्यद, वसीम मोमीन ,असीफ बागवान, विशाल गुंड, रिजवान मोमीन, ग्रामसेवक संजय पवार आदी उपस्थित होते.

### सुविधा देऊ, नियमांचे पालन करा

व्यवसायीकांनी केलेल्या सर्व सुचनांची अंमलबजावणी करण्यात येईल. व्यवसायीकांनीही नियमांचे पालन करावे. पुलावर कचरा टाकल्यानंतर वाऱ्याने तो रस्त्यावर येतो. लवकरच घनकचरा प्रकल्प पुर्णत्वास जाणार असून त्यासाठी मोठया निधीची तरतुद करण्यात आली आहे. घनकचरा व्यवस्थापनाची काटेकोरपणे अंमलबजावणी करून आपणास स्वच्छ व सुंदर निघोज कसे होईल यासाठी प्रयत्न करायचे आहेत.

**ज्ञानेश्वर वरखडे**
उपसरपंच, निघोज.

### दंड तसेच नागरी सुविधाही बंद !

यापुढील काळात रस्त्यावर कचरा टाकणाऱ्या कुणाचीही गय केली जाणार नाही असा इशारा देतानाच नियम मोडणाऱ्यांना साडेपाच हजार रूपये दंड करण्यात येईल. शिवाय संबंधित नागरीकास ग्रामपंचायतीच्या वतीने देण्यात येणाऱ्या सुविधाही बंद करण्यात येतील असा इशाराही देण्यात आला आहे.

### व्यवसायीकांसाठी स्वतंत्र घंटागाडी

व्यवसायीकांच्या सोईसाठी दररोज सायंकाळी सात ते नऊच्या दरम्यान प्रत्येक व्यवसायीकाच्या दारामध्ये घंटागाडी पाठविण्यात येणार असून घंटागाडीमध्ये सुका व ओला कचरा स्वतंत्रपणे टाकून ग्रामपंचायतीस सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# संत निळोबाराय पालखी सोहळयाचा रथ सज्ज!

## पिंपळनेर येथे पार पडली चाचणी



संत निळोबाराय पालखी सोहळयाच्या रथाची मंगळवारी चाचणी घेण्यात आली.

पिंपळनेर : प्रतिनिधी

**संत परंपरेतील अखेरचे संत संत निळोबाराय यांच्या येत्या २ जुलै रोजी पंढरपुरकडे प्रस्थान होणाऱ्या आषाढी पालखी सोहळयासाठीचा रथ सज्ज झाला असून त्याची मंगळवारी चाचणी पार पडली.**

या रथासाठी रांधे येथील युवा शेतकरी संतोष काटे यांची बैलजोडी जुंपण्यात येणार आहे. काटे यांना बैलजोडीचा मान मिळाल्यानंतर त्यांनी रथासाठी नवी बैलजोडी खरेदी केली आहे. धाकटी पंढरी म्हणून ओळख असलेल्या श्री क्षेत्र पिंपळनेर येथून पालखी सोहळयाचे २ जुलै रोजी प्रस्थान होणार आहे.

बैलजोडीचा मान मिळाल्यानंतर काटे यांनी खा. नीलेश लंके यांनी नगर येथे आयोजित केलेल्या शिवपुत्र संभाजी या महानाटयामध्ये असलेली बैलजोडी खरेदी करण्याचा प्रयत्न केला मात्र त्यात त्यांना यश आले नाही. त्यानंतर काटे यांनी सोलापूर येथील शेतकऱ्याने कर्जतच्या बाजारात विक्रीसाठी आणलेली भारदस्त बैलजोडी काटे यांना भावली. त्यांनी ही बैलजोडी खरेदी केली असून ती संत निळोबाराय महाराजांच्या पालखी सोहळयाच्या रथासाठी वापरण्यात येणार आहे.

रथाच्या चाचणी प्रसंगी देवस्थानचे अध्यक्ष अशोक सावंत, कार्याध्यक्ष गोपाळकाका मकाशिर, विश्वस्त भाऊसाहेब लटांबळे, सचिव चांगदेव शिर्के, बाळासाहेब सावंत, तुकाराम गाजरे, बैल जोडीचे नियोजन करणारे संतोष काटे, रामदास शेटे, उत्तम पावडे, संपत कड, रामदास भोसले, केरूभाऊ म्हस्कुले, साईनाथ झिंजाड, सुरेश सरोदे, नवनाथ शेटे, ओम काटे, राजेश आवारी, सार्थक कड आदी उपस्थित होते.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com